# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि. २४/०५/२०२२

**आलोसे क्र.१** दिपक नारायण इंगोले वय ४२ वर्षे,रा.व्यास चक्कीचे बाजुला सिव्हील लाईन वाशिम ता. जि.वाशिम व **आरोपी क्र.२** असलम जमिल सिद्दीकी वय ५५ वर्षे,रा.शिवाजी नगर मंगरुळपीर जि.वाशिम यांना १,००,०००/- रुपयेची यशस्वी सापळा प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | **आलोसे क्र.१** दिपक नारायण इंगोले,पद-मुख्याधिकारी मंगरुळपीर वय ४२ वर्षे,रा. व्यास चक्कीचे बाजुला सिव्हील लाईन वाशिम ता. जि.वाशिम<br>**आरोपी क्र.२** असलम जमिल सिद्दीकी (खाजगी ईसम)वय ५५ वर्षे,रा.शिवाजी नगर मंगरुळपीर जि.वाशिम. |
| लाच रक्कम | १,००,०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या प्लॉट वरील अतिक्रमण काढुन देण्याकरीता तक्रारदारास लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | एम.एम.अफुने, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांचे मंगरुळपीर शहरातील सर्वे नं.२२७ अ मधील प्लॉट क्र.५२ मध्ये काही लोकांना कॅबील टाकुन अतिक्रमण केले होते ते अतिक्रमण काढुन देण्याकरीता आलोसे क्र१ दिपक नारायण इंगोले हे आरोपी क्र.२ असलम सिद्दीकी यांचे मार्फतीने १,००,०००/-रु लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २२.३.२०२२ रोजी मंगरुळपीर येथे पो.नि.एम.एम. अफुने ला.प्र.वि.वाशिम यांचेकडे तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि. २२/०३/२०२२ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे क्र१ दिपक नारायण इंगोले यांनी तक्रारदार यांना आरोपी क्र.२ असलम सिद्दीकी यांचे शी संबधीत कामाबद्दल भेटण्यास सांगीतले दि.६.५.२२ व दि.१२.५.२०२२ खाजगी ईसम असलम सिद्दीकी यांनी तक्रारदारास प्लॉटवरील अतिक्रमण काढणे संबधाने सि.ओ साहेबांशी बोलुन कामा संबधी बोलणी केली व दि.२३.५.२०२२ रोजी प्लॉट वरील अतिक्रमण काढुन देण्याकरीता खाजगी इसम असलम सिद्दीकी १,००,०००/-रु लाचेची मागणी केल्याचे निषन्न झाले..

दि. २४/०५/२०२२ रोजी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान खाजगी असलम सिद्दीकी यांनी सुफी स्टोन क्रेशर कार्यालय मानोरा चौक मंगरुळपीर येथे पंचासमक्ष तक्रारदार यांचे कडुन लाच रक्कम १,००,०००/-रु स्विकारले. वरुन खाजगी इसम असलम सिद्दीकी यांचे कडुन पंचासमक्ष लाचेची रक्कम जप्त करुन आलोसे क्र.१. दिपक इंगोले व आरोपी क्र.२ असलम सिद्दीकी यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आलोसे क्र.१. दिपक इंगोले व आरोपी क्र.२ असलम सिद्दीकी यांचे विरुध्द तक्रारदार यांचे फिर्याद वरुन पोलीस स्टेशन मंगरुळपीर जि. वाशिम येथे गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विशाल वि. गायकवाड, मा.अपर पोलीस अधिक्षक देविदास घेवारे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, पोलीस उपअधिक्षक गजानन आर. शेळके यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीमती अफुने,पोलीस निरीक्षक श्री.महेश भोसले व अंमलदार सपोउपनि दिलीप बेलोकार,पोहवा.नितीन टवलारकर, आसिफ शेख, पोना.विनोद अवगळे व योगेश खोटे ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन श्रीमती अफुने, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
एम.एम.अफुने - ८३९०७६१५०३

( एम.एम.अफुने )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.